तरुण भारत संवाद
सोमवार, १५ एप्रिल २०२४

### विवेकानंद कॉलेज

भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रा. एच. व्ही. चामे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे तरूणांनी आचरण केले पाहिजे, असे सांगितले. यावेळी प्रा. समीक्षा फराकटे, आर. बी. जोग, सुनिता भोसले, प्रा. जे आर. भरमगोंडा, डॉ. कैलास पाटील, डॉ. संजय अंकुशराव, प्रा. एम. ए. कुरणे आदी उपस्थित होते.

15/04/24

२ पुण्य नगरी ▮ सोमवार, १५ एप्रिल २०२४

**विवेकानंद कॉलेज :** विवेकानंद महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. एच. व्ही. चामे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले. आभार डॉ. दादासाहेब घाडगे यांनी मानले. दरम्यान, ग्रंथालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावरील आधारित ग्रंथांचे प्रदर्शन मांडले आहे. समाजशास्त्र व राज्यशास्त्र विभागातर्फे आयोजित कार्यक्रमास रजिस्ट्रार आर. बी. जोग, एनसीसी प्रमुख कॅप्टन सुनीता भोसले, लेप्टनंट प्रा. जे. आर. भरमगोंडा, डॉ. कैलास पाटील, डॉ. संजय अंकुशराव, प्रा. एम. ए. कुरणे आदी उपस्थित होते.

15/04/24

15/4/24